स.फौ.ख.क्र. ४३०७२/२०२२
नि.६

**आरोपीतर्फे वकील श्री एस. व्ही . चव्हाण यांचे तर्फे उलटतपास पुढे चालू**

१५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी फिर्यादीस रक्कम रु. ५०५८७१६.८१ देणे लागतो याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. फियार्दी कंपनी व आरोपीचे साधारणपणे १५ वर्षांपेक्षा जास्ती व्यावसायिक संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फिया्र्दी कंपनीने आरोपींकडून व्यावसायिक व्यवहारापोटी वेळोवेळी सही केलेले धनादेश घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, धनादेश देताना आरोपीनी त्यावर रक्कम भरली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, फिया्द व पुराव्याच्या प्रतिज्ञापत्राबत आरोपी वादातीत धनादेशांची रक्कम देणे लागतात याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

१६. वादातीत धनादेश कोणत्या बिलापोटी दिला आहे हे मी प्रकरण बघून सांगू शकतो. साक्षीदारांने संचिकेचे अवलोकन केले असता कोणत्या बिलापोटी अवलोकन केले हे नमूद केले नाही . हे म् णणे खरे नाही की, आरोपीनी फिर्यादी कंपनीस कोणत्याही कायदेशीर देणेपोटी धनादेश दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की माझी फिर्याद, नोटीस तसेच पुराव्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद असल्याप्रमाणे आरोपीनी रक्कम रु. २६,००० रु.चा कोणताही धनादेश फिया्र्दी कंपनीस दिलेला नाही. हे म्हणण ेखरे नाही की आरोपीनी वेळोवेळी रकमा दिल्याने आज रोजी ते कोणतेही देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीनी सही करुन दिल्ेल्या धनादेशाचा गैरवापर केला आहे.

१७. हे म्हण्णे खरे नाही की, आरोंपीकडून पैसे उकळण्यासाठी खोटी फिर्याद दाखल करुन खोटी साक्ष् देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

SHEETAL PADMAKAR KESTIKAR NALAGE
Digitally signed by SHEETAL PADMAKAR KESTIKAR NALAGE
Date: 2026.07.17 18:21:01 +0530

एस. पी. केस्तीकर-नलगे

१७-०७-२०२६ अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी,पुणे